तक्रार यूएलपी क्रमांक २४/२०१७
निशाणी यू—२०

शपथेवरून सुरू.

मला निशाणी यू—२० चे शपथपत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

दिनांक २३/०६/२०२३ (शाम वि. सुर्यवंशी)
सदस्य,
सातारा. औद्योगिक न्यायालय, सातारा

**<u>श्री.डी.एस.पाटील तक्रारदाराचे विधीज्ञ यांचेकडून साक्षीदाराचा सरतपास पुढे सुरू.</u>**

१. मी दिनांक ०३/०६/२०१७ रोजी प्रतिवादी क्रमांक २ संघटनेचा राजीनामा दिला होता. प्रतिवादी क्रमांक १ कंपनीने आमचे पगारातून वसूल केलेली युनियन वर्गणी प्रतिवादी क्रमांक २ संघटनेकडे वर्ग करू नये म्हणुन आम्ही दिनांक २९/०६/२०१७ रोजी प्रतिवादी क्रमांक २ यांना मी पत्र दिले होते. अशाच प्रकारचे पत्र इतर कर्मचा—यांनी देखील दिले असेल.

**<u>प्रतिवादी क्रमांक १ चे विधीज्ञ श्री. जोशी यांचेकडून साक्षीदाराचा उलटतपास</u>**

२. प्रतिवादी क्रमांक २ संघटना ही प्रतिवादी क्रमांक १ यांचे शिरवळ आस्थापनेवर मान्यताप्राप्त संघटना आहे. सदर संघटनेसोबत प्रतिवादी क्रमांक १ कंपनीने दिनांक २२/०८/२०१७ रोजी वेतनवाढ करार केला आहे. सदर कराराचे फायदे मला मिळालेले आहेत. सदर करारामध्ये उत्पादनावर आधारीत

तक्रार यूएलपी क्रमांक २४/२०१७
निशाणी यू—२०

पगारवाढ देण्यात आलेली आहे. ज्या कर्मचा—यांनी कराराप्रमाणे उत्पादन दिले नाही त्यांना पगारवाढ मिळालेली नाही. श्री.संजय दगडे व इतर १७ कर्मचारी यांनी करार झालेपासून त्यांना बडतर्फ करेपर्यंत कराराप्रमाणे उत्पादन केले नाही याची मला कल्पना नाही. वरील कर्मचा—यांना नोकरीवरून कमी करण्यात आले आहे याची मला कल्पना आहे परंतु त्यांना का कमी केले हे मला माहित नाही.

३. मी सन २०२२ मध्ये पुन्हा प्रतिवादी क्रमांक २ संघटनेचे सभासदत्व मिळावे म्हणुन अर्ज केला. हे म्हणणे बरोबर आहे की, प्रतिवादी क्रमांक २ संघटनेने माझी युनियन वर्गणी ११ टक्के व्याजासह धनादेशाद्वारे परत केली. माझेप्रमाणेच अजून १५ ते २० लोकांना देखील युनियन वर्गणी परत करण्यात आलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की तक्रारदार संघटनेने त्यांचे सभासदत्वाचा अर्ज आमचेकडून जबरदस्तीने घेतला. माझी प्रतिवादी क्रमांक १ विरूध्द काही तक्रार नाही. हे म्हणणे बरोबर आहे की आज रोजी माझी सभासद वर्गणी माझे इच्छेप्रमाणे कपात करून ती प्रतिवादी क्रमांक २ संघटनेकडे पाठविली जात आहे. सदरची कपात दिनांक २२/०८/२०१७ रोजीच्या कराराप्रमाणे होत आहे.

तक्रार यूएलपी क्रमांक २४/२०१७
निशाणी यू—२०

**<u>प्रतिवादी क्रमांक २ तर्फे विधीज्ञ श्री.दिनेश तोडकर यांचेकडून</u>**

**<u>साक्षीदाराचा उलटतपास</u>**

४. हे म्हणणे बरोबर आहे की सन २०२२ मध्ये मी पुन्हा प्रतिवादी क्रमांक २ चा सभासद झालो. प्रतिवादी क्रमांक २ संघटनेकडे माझी सभासद वर्गणी जी पाठविली गेली व जात आहे त्याबददल माझी प्रतिवादी संघटनेविरूध्द काही तक्रार नाही.

उलटतपास संपला. पुन:तपास काही नाही.

दिनांक २३/०६/२०२३ (शाम वि. सुर्यवंशी)
सदस्य,
सातारा. औद्योगिक न्यायालय, सातारा